नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १५७ Issue - 157 | वार सोमवार दि. २७ ऑक्टोबर २०२५ Blow- Monday Date 27 October 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# पुढील आठवड्यात देशभरात मतदार याद्या सुधारणा कार्यक्रम सुरु होणार

## अंतिम एसआयआर कट-ऑफ तारीख म्हणून काम करेल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : निवडणूक आयोग पुढील आठवड्यात देशभरातील मतदार याद्या सुधारणा कार्यक्रम सुरू करण्याची अपेक्षा आहे. त्याची सुरुवात १०-१५ राज्यांपासून होईल. पुढील वर्षाच्या आत ज्या राज्यांमध्ये विधानसभा निवडणू होणार आहे तिथं प्रथम डखठ केले जाईल. २०२६ मध्ये आसाम, तामिळनाडू, पुडुचेरी, केरळ आणि पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. निवडणूक आयोगाच्या एका अधिकाऱ्याने स्पष्ट केले की, ज्या राज्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत तेथे डखठ आता केले जाणार नाही. कारण कनिष्ठ दर्जाचे कर्मचारी त्या निवडणुकांमध्ये व्यस्त असतील आणि त्यांना डखठ साठी वेळ मिळू शकणार नाही. निवडणुकीनंतर या राज्यांमध्ये डखठ केले जाईल.



एसआयआर लागू करण्यासाठीची चौकट अंतिम करण्यासाठी आयोगाने अलीकडेच राज्य मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांसोबत दोन बैठका घेतल्या. अनेक सीईओंनी त्यांच्या संबंधित राज्यांच्या वेबसाइटवर शेवटच्या डखठ नंतर जारी केलेल्या त्यांच्या मतदार याद्या अपलोड केल्या आहेत. २००८ ची मतदार यादी दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या वेबसाइटवर आहे. २००८ मध्ये तेथे एसआयआर करण्यात आला होता. उत्तराखंडमध्ये, शेवटचा एसआयआर २००६ मध्ये घेण्यात आला होता आणि त्यावेळची मतदार यादी आता राज्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. बिहारमध्येही अलीकडेच मतदार पडताळणी करण्यात आली. अंतिम डेटा १ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आला. निवडणूक आयोगाने एसआयआरसाठी २००३ च्या बिहारच्या मतदार यादीचा वापर केला होता त्याचप्रमाणे अंतिम एसआयआर राज्यांसाठी कट-ऑफ तारीख म्हणून काम करेल. बहुतेक राज्यांमध्ये, मतदार यादीचा शेवटचा एसआयआर २००२ ते २००४ दरम्यान करण्यात आला होता. बहुतेक राज्यांनी त्यांच्या संबंधित राज्यांमध्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांमध्ये केलेल्या शेवटच्या एसआयआरच्या आधारे विद्यमान मतदारांशी जुळणी करण्याचे काम जवळजवळ पूर्ण केले आहे. एसआयआरचा प्राथमिक उद्देश परदेशी बेकायदेशीर स्थलांतरितांचे जन्म स्थान पडताळणे आणि त्यांना काढून टाकणे आहे. बांगलादेश आणि म्यानमारसह विविध राज्यांमध्ये बेकायदेशीर स्थलांतरितांवरील कारवाई लक्षात घेता हे पाऊल महत्त्वाचे आहे.

आयोगाचा दावा आहे की त्यांचे पूर्ण लक्ष केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि जम्मू आणि काश्मीरवर आहे. बंगाल, आसाम आणि पुद्दुचेरी येथे लक्ष केंद्रित केले आहे, जिथे मे २०२६ पर्यंत निवडणुका होणार आहेत. एसआयआरचा उद्देश मतदार यादीतून डुप्लिकेट मतदार काढून टाकणे आणि मतदार भारतीय नागरिक आहे याची खात्री करणे आहे.

**बिहारमध्ये एसआयआरवरून वाद**

बिहार निवडणुकीपूर्वी एसआयआरवरून वाद निर्माण झाला. विरोधी पक्षांनी सरकारवर मत चोरीचा आरोप केला. हा खटला अजूनही सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या प्रक्रियेला मान्यता दिली. आयोगाने बिहारची अंतिम मतदार यादी देखील सर्वोच्च न्यायालयात सादर केली आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मत चोरीचा आरोप करत पत्रकार परिषद घेतली होती.

# निवडणूक आयोगाच्या 'पुनर्निरीक्षण' निर्णयाचे मुख्यमंत्री फडणवीसांकडून स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नागपूर : देशभरात निवडणूक आयोगाकडून मतदार याद्यांचे एसआयआर (सिस्टेमॅटिक इलेक्टोरल रोल रिव्हिजन) करण्याची घोषणा होत असल्याची माहिती समोर आली असून, या निर्णयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वागत केले आहे. त्यांनी सांगितले की, ही घोषणा लोकशाही मजबूत करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे आणि मी याचे मनःपूर्वक स्वागत करतो.

फडणवीस म्हणाले की, मी स्वतः २०१२ साली उच्च न्यायालयात गेलो होतो. तेव्हा मी ही मागणी केली होती की मतदार याद्यांचे संपूर्ण पुनर्निरीक्षण झाले पाहिजे. मागील २५ वर्षांपासून केवळ संक्षिप्त पुनरनिरीक्षण चालू होते, पण संपूर्ण पुनरावलोकन होत नव्हते. त्यामुळे एसआयआर प्रक्रिया अत्यंत गरजेची होती. आता ती देशभर राबविली जाणार असल्याने मला खूप समाधान वाटते.

त्यांनी पुढे सांगितले की, एसआयआर प्रक्रियेनंतर मतदार याद्या ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित करण्यात याव्यात. यामुळे पारदर्शकता आणि सुरक्षितता वाढेल. एखाद्या मतदाराने राज्य बदलले तरी त्याचा आयडी दुसऱ्या ठिकाणी कायम राहील, अशी सुसंगत प्रणाली तयार होणे आवश्यक आहे. फडणवीस यांनी हेही नमूद केले की, ही प्रक्रिया झाल्यास मतदार नोंदीतील त्रुटी कमी होतील आणि मतदार यादी अधिक विश्वसनीय बनेल.

या घोषणेच्या विरोधात विरोधक मोर्चा काढण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळताच, फडणवीस यांनी विरोधकांवर तीव्र टीका केली. त्यांनी म्हटले, विरोधक हे पूर्णपणे निराश झाले आहेत. त्यांना आधीच माहिती आहे की येणाऱ्या निवडणुकीत त्यांचा पराभव निश्चित आहे. त्यामुळे पराभव झाकण्यासाठी ते 'कव्हर फायर' करत आहेत.

ज्यांची नोट चोरी बंद झाली आहे, ते आता वोट चोरीचा आवाज लावत आहेत. पण हे लक्षात ठेवा, 'ये पब्लिक है, सब जानती है.' जनतेला सर्व काही कळते आणि ती चुकीच्या प्रचाराला बळी पडणार नाही. असा टोला फडणवीसांनी विरोधकांना लगावला.

दरम्यान, फलटण आत्महत्येच्या प्रकरणावरून काँग्रेस नेते राहुल गांधींनी केलेल्या आरोपांना उत्तर देताना फडणवीसांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले, राहुल गांधी जे ट्वीट करतात ते त्यांना स्वतःलाच समजत नाहीत. त्यांना घटनेची संपूर्ण माहिती नसते. फलटण येथील महिला डॉक्टरच्या आत्महत्येच्या प्रकरणात तिने आपल्या हातावर लिहून ठेवले आहे, त्यामुळे प्रकरण स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात कुणालाही क्षमा दिली जाणार नाही.

फडणवीसांनी काँग्रेसवर टीका करताना म्हटले की, दुर्दैवाने राहुल गांधी आणि त्यांच्या पक्षातील लोक संवेदनशील घटनांमध्येही राजकारण करण्याची संधी सोडत नाहीत.या प्रकारच्या संवेदनशील घटनेतही पोळ्या भाजणं विसरत नाही, हे फार मोठ दुर्दैव आहे.

# ही तर संस्थात्मक हत्या, सत्तेकडून गुन्हेगारांना संरक्षण; राहुल गांधींचा हल्लाबोल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सातारा जिल्ह्यातील फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर युवतीने केलेली आत्महत्या ही आत्महत्या नसून ही संस्थात्मक हत्या असल्याचा गंभीर आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. राहुल गांधी यांनी आज ट्विट करत प्रकरणावर भाष्य केला आहे. जेव्हा सत्ता गुन्हेगारांना संरक्षण देते, तेव्हा न्यायाची अपेक्षा कोण करू शकते? या मृत्यूने या भाजप सरकारचा अमानवी आणि निर्दयी स्वभाव उघडकीस आणला आहे. न्यायाच्या या लढाईत आम्ही पीडितेच्या कुटुंबासोबत खंबीरपणे उभे आहोत. भारताच्या प्रत्येक मुलीसाठी आता भीती नाही, आम्हाला न्याय हवा असल्याचे राहुल यांनी म्हटले आहे.



राहुल यांनी ट्विट करत म्हटले आहे की, महाराष्ट्रातील सातारा येथे छळ आणि छळ सहन केल्यानंतर डॉ. संपदा मुंडे यांची आत्महत्या ही कोणत्याही सुसंस्कृत समाजाच्या विवेकाला हादरवून टाकणारी एक शोकांतिका आहे. इतरांचे दुःख कमी करण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या एका होनहार डॉक्टरला भ्रष्ट व्यवस्थेतील गुन्हेगारांच्या छळाचा बळी पडला. गुन्हेगारांपासून जनतेचे रक्षण करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर सोपवण्यात आली होती त्यांनी या निष्पाप महिलेविरुद्ध सर्वात घृणास्पद गुन्हा केला: बलात्कार आणि शोषण. वृत्तांनुसार, भाजपशी संबंधित काही प्रभावशाली लोकांनी तिच्यावर भ्रष्टाचार करण्यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्नही केला.

सत्तेने संरक्षित गुन्हेगारी विचारसरणीचे हे सर्वात घृणास्पद उदाहरण आहे. ही आत्महत्या नाही, ही संस्थात्मक हत्या आहे. जेव्हा सत्ता गुन्हेगारांना संरक्षण देते, तेव्हा न्यायाची अपेक्षा कोण करू शकते? डॉ. संपदा यांच्या मृत्यूने या भाजप सरकारचा अमानवी आणि निर्दयी स्वभाव उघडकीस आणला आहे. न्यायाच्या या लढाईत आम्ही पीडितेच्या कुटुंबासोबत खंबीरपणे उभे आहोत. भारताच्या प्रत्येक मुलीसाठी आता भीती नाही, आम्हाला न्याय हवा आहे.

# फलटण डॉक्टर तरुणी आत्महत्या प्रकरणी निलंबित पीएसआय गोपाल बदनेला ५ दिवसांची पोलीस कोठडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा : फलटणच्या डॉक्टर तरुणी आत्महत्या प्रकरणातील संशयित आरोपी गोपाल बदने याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सह दिवाणी न्यायाधीश ए. एस. साटोटे यांच्या कोर्टाने ३० ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. पोलिसांनी ७ दिवसांची पोलीस कोठडी मागितली होती. मात्र, आरोपीचे वकील ड. राहुल धायगुडे यांनी आरोपीचा यात कोणताही दोष नसून त्याला गोवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा युक्तिवाद करत आरोपी बदने याला १ दिवसांची पोलीस कोठडी द्यावी, असा युक्तिवाद केला मात्र कोर्टाने ५ दिवसाची पोलीस कोठडी दिली आहे.

सरकारी वकील ॲड. सुचिता वायकर-बाबर यांनी याला आक्षेप घेत मरणारी व्यक्ती कधीही खोटं बोलत नसते, असा दाखला देत आरोपीच्या मेडिकल टेस्ट, मोबाईल, वाहन तसेच घटनास्थळाचा तपास करायचा असून आरोपीला ७ दिवसांची पोलीस कोठडीची मागणी केली.



सरकारी वकिलांकडून हा गुन्हा अत्यंत गंभीर असून महिलांच्या आत्मसन्मानाला धक्का लावणारा आहे.मोबाईल जप्त करण्यासाठी डिजिटल पुरावे गोळा करण्यासाठी सात दिवसांची पोलिस कोठडी आवश्यक आहे. सुसाईड नोट मध्ये असलेल्या बलात्काराचा उल्लेख तपासायचा आहे. लैंगिक अत्याचाराच्या घटनेची दोघांनाच माहिती, त्यातील एक मयत असल्याने गुन्हा करण्याची ठिकाणं, पद्धत या सगळ्यांचा तपास करायचाय, असा युक्तिवाद सरकारी वकिलांकडून करण्यात आला.

आरोपीच्या वकिलांकडून युक्तिवाद करताना एफआयआरमधल्या नोंदी विरोधाभासी आहेत, असं मांडलं गेलं. दोन गुन्हे असताना एकच एफआयआर करण्यात आलाय. सुसाईड नोट मध्ये अत्याचाराचा आणि छळवणूक केल्याचा उल्लेख प्रशांत बनकरच्या संबंधाने आहे. चार महिने त्यांच्यात लग्न करण्यावरून विवाद सुरू होते.

पीडषत महिला आरोपी क्रमांक एकच्या घरी राहत होती. आत्महत्या करायला ती हॉटेल मध्ये का आली? तिला बाहेर जायला प्रवृत्त करण्यात आलं होतं का? हा प्रश्न अनुत्तरित (पान २ वर...)

## चंद्रभागा नदीपात्र व वाळवंट स्वच्छतेसाठी जास्तीचे स्वच्छता कर्मचारी नियुक्त करावेत

**परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या सूचना**

# यात्रा कालावधीत स्वच्छतेला व भाविकांच्या सुलभ दर्शनाला प्राधान्य द्यावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : कार्तिकी शुद्ध एकादशी सोहळा २ नोव्हेंबर २०२५ रोजी असून, या यात्रा सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्याच्या विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात. या यात्रा कालावधीत प्रशासनाने स्वच्छतेला प्राधान्य द्यावे तसेच मंदिर समितीने भाविकांना आवश्यक सुविधाबरोबरच सुलभ व सुखकर दर्शन देण्याचे नियोजन करावे, अशा सूचना राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिल्या.

कार्तिकी यात्रा नियोजनाबाबत केबीपी कॉलेज, महाविद्यालय येथील सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस शिक्षणमंत्री दादा भुसे, आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे ,अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, एसटी महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक श्रीमती अमृता ताम्हणकर, विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, मंदीर समिती सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, ह.भ.प राणा महाराज वासकर तसेच संबधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले, आषाढी यात्रा कालावधीत प्रशासनाने वारकरी भाविकांसाठी चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या त्याचप्रमाणे कार्तिक यात्रेतही चांगल्या सुविधा द्याव्यात. यात्रा कालावधीत चंद्रभागा नदीपात्र व वाळवंट येथील स्वच्छता याची दक्षता घेऊन स्वच्छतेसाठी जास्तीचे स्वच्छता कर्मचारी नियुक्त करावेत. भाविकांना पायी चालत असताना

**जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनाही शासकीय महापूजेच्या वेळी मान मिळावा : शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे**

कच खडी दगड लागणार नाहीत याची दक्षता घेऊन भक्ती सागर ६५ एकर येथे मुरूम खडी टाकल्यानंतर तात्काळ रोलिंग करून घ्यावे, विशेषता प्रदक्षिणा मार्गावर मोठ्या प्रमणात दिंड्या बरोबर वारकरी भाविक अनवाणी चालत प्रदक्षिणा घालतात यावेळी त्यांच्या पायांना कच खडी लागणार नाही याची प्रामुख्याने दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

दिंडी सोहळ्यांनी प्रथा परंपरेप्रमाणे टाळ मृदंगाच्या गजरात प्रदक्षिणा पूर्ण करावी. लाऊड स्पीकर वापर करू नये. लाऊड स्पीकर चा वापर केल्यास तात्काळ पोलीस प्रशासनाने कारवाई करावी. कार्तिकी यात्रा संपल्यानंतर मोठ्या प्रमाणात दिंड्या पंढरपूरहुन आळंदी कडे रवाना होतात या दिंड्यांना आवश्यक सुविधा देण्याबरोबरच परिवहन विभाग व पोलीस प्रशासनाने मार्गावर सुरक्षा व्यवस्था देण्याबाबत तात्काळ अंमलबजावणी करावी. कार्तिकी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांच्या सुविधेसाठी १०५० बसेसची व्यवस्था करण्यात आली असून सर्व बसेस सुस्थितीत ठेवाव्यात. पंढरपूर शहरात येणाऱ्या सर्वच मार्गावरील



खड्डे सार्वजनिक बांधकाम व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी तात्काळ बुजवावेत. तसेच पंढरपूर शहरातील खड्डे नगरपालिका प्रशासनाने तात्काळ बुजवावेत अशा सूचनाही परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिल्या.

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनाही शासकीय महापूजेच्या वेळी मान मिळावा : शिक्षणमंत्री दादा भुसे

कार्तिकी एकादशी सोहळ्या निमित्त मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणाऱ्या शासकीय पूजेच्या वेळी ज्याप्रमाणे दर्शन रांगेतील भाविकाला सपत्नीक पूजेचा मान दिला जातो. त्याचप्रमाणे राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील दोन विद्यार्थ्यांनाही शासकीय महापूजेच्या वेळी मान मिळावा असे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी शिक्षण मंत्री भुसे म्हणाले, कार्तिकी यात्रा कालावधीत मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपूरला येतात. भाविकांना स्वच्छ पिण्याचे, पाणी सुलभ शौचालय, मुबलक प्रमाणात औषध साठा उपलब्ध ठेवावा. तसेच वारकरी (पान २ वर...)

## संपादकीय....

### पुनर्निरीक्षणाची तयारी

देशभरात निवडणूक आयोगाकडून मतदार याद्यांचे एसआयआर (सिस्टेमॅटिक इलेक्टोरल रोल रिव्हिजन) करण्याची घोषणा झाली. मागील २५ वर्षांपासून केवळ संक्षिप्त पुनर्निरीक्षण चालू होते, पण संपूर्ण पुनरावलोकन होत नव्हते. त्यामुळे एसआयआर प्रक्रिया अत्यंत गरजेची होती. आता ती देशभर राबविली जाणार आहे. एसआयआर प्रक्रियेनंतर मतदार याद्या ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित करण्यात याव्यात. यामुळे पारदर्शकता आणि सुरक्षितता वाढेल. एखाद्या मतदाराने राज्य बदलले तरी त्याचा आयडी दुसऱ्या ठिकाणी कायम राहील, अशी सुसंगत प्रणाली तयार होणे आवश्यक आहे. निवडणूक आयोग पुढील आठवड्यात देशभरातील मतदार याद्या सुधारणा कार्यक्रम सुरू करण्याची अपेक्षा आहे. त्याची सुरुवात १०-१५ राज्यांपासून होईल. पुढील वर्षाच्या आत ज्या राज्यांमध्ये विधानसभा निवडणू होणार आहे तिथं प्रथम ड्खठ केले जाईल. २०२६ मध्ये आसाम, तामिळनाडू, पुडुचेरी, केरळ आणि पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. निवडणूक आयोगाच्या एका अधिकाऱ्याने स्पष्ट केले की, ज्या राज्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत तेथे ड्खठ आता केले जाणार नाही. कारण कनिष्ठ दर्जाचे कर्मचारी त्या निवडणुकांमध्ये व्यस्त असतील आणि त्यांना एसआयआर साठी वेळ मिळू शकणार नाही. निवडणुकीनंतर या राज्यांमध्ये एसआयआर केले जाईल. एसआयआर लागू करण्यासाठीची चौकट अंतिम करण्यासाठी आयोगाने अलीकडेच राज्य मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांसोबत दोन बैठका घेतल्या. अनेक सीईओंनी त्यांच्या संबंधित राज्यांच्या वेबसाइटवर शेवटच्या ड्खठ नंतर जारी केलेल्या त्यांच्या मतदार याद्या अपलोड केल्या आहेत. २००८ ची मतदार यादी दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या वेबसाइटवर आहे. २००८ मध्ये तेथे एसआयआर करण्यात आला होता. उत्तराखंडमध्ये, शेवटचा एसआयआर २००६ मध्ये घेण्यात आला होता आणि त्यावेळची मतदार यादी आता राज्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. बिहारमध्येही अलीकडेच मतदार पडताळणी करण्यात आली. अंतिम डेटा १ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आला. निवडणूक आयोगाने एसआयआरसाठी २००३ च्या बिहारच्या मतदार यादीचा वापर केला होता त्याचप्रमाणे अंतिम एसआयआर राज्यांसाठी कट-ऑफ तारीख म्हणून काम करेल. बहुतेक राज्यांमध्ये, मतदार यादीचा शेवटचा एसआयआर २००२ ते २००४ दरम्यान करण्यात आला होता.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कधीच बंद करणार नाही : मुख्यमंत्री फडणवीस

## पाच वर्ष आमच्या शेतकऱ्यांना विजेचं कुठलंही बिल भरावं लागणार नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेद्वारे दर महिन्याला पात्र लाभार्थी महिलांना १५०० रुपये दिले जातात. ऑक्टोबरच्या हप्त्याचे १५०० रुपये कधी मिळणार याकडे राज्यातील पात्र लाभार्थी महिलांचे लक्ष लाग-ले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. फडणवीस यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कधीच बंद करणार नाही, असं म्हटलं आहे. ते फलटण येथील कार्यक्रमात बोलत होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, आपलं जे महायुतीचं सरकार आहे ते विकासाचा विचार करणारं सरकार आहे.आम्ह-ाला समाजातील प्रत्येक व्यक्तीचा विकास हवाय. या महाराष्ट्रातील दुष्काळी भाग आहे त्यातला दुष्काळ आम्हाला दूर करायचा आहे. आमच्या शेतकऱ्यांना त्या ठिकाणी आम्हाला मदत करायची आहे. आपण बघा महाराष्ट्रतल्या शेतकऱ्यांवर संकट आल्यानंतर आजपर्यंतच्या इतिहासातील सर्वात मोठं पॅकेज ३२ हजार कोटी रुपयांचं पॅकेज त्या ठिकाणी आम्ही शेतकऱ्यांकरता दिलं आणि आज शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जाणं देखील सुरु झालं आहे. कुठल्याही परिस्थितीत आम्ही सुरु केलेल्या योजना कधीच




बंद होऊ देणार नाही. सातत्यानं काही लोकं सांगतात,लाडकी बहीण योजना बंद होणार, मी तुम्हाला सांगतो, जोपर्यंत देवाभाऊ आहे, शिंदे साहेब आहेत, अजित दादा आहेत, तोपर्यंत लाडकी बहीण योजना आम्ही कधीच बंद होऊ देणार नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आमच्या लाडक्या बहिणींना दिवाळीची भाऊबीज आहे ती सातत्यानं मिळत राहील, हा विश्वास देतो, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. आमच्या शेतकऱ्यांना वीज सवलत आम्ही दिले-ली आहे. विजेचं बिल जे माफ केलेलं आहे, पाच वर्ष आमच्या शेतकऱ्यांना विजेचं कुठलंही बिल भरावं लागणार नाही, हे पुन्हा एकदा सांगतो, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. पाच वर्षांनी तुम्ही आमचं कॉन्ट्रॅक्ट तुम्ही रिन्यू केला तर अजून पाच वर्षापर्यंत तुम्हाला सवलत देऊ, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. आतातरी पाच वर्षापर्यंत वीज सवलत ठेवलेली आहे. सौरऊर्जाकरण करतोय, त्यानंतर २०२६ च्या डिसेंबरमध्ये काम पूर्ण झाल्यानंतर आमच्या शेतकऱ्यांना ३६५ दिवस, दिवसा १२ तास वीज आणि मोफत वीज दिल्याशिवाय राहणार नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. आमच्या सगळ्या उपसा सिंचन योजना सोलरवर टाकणार आहोत. आमच्या उपसा सिंचन योजनांना सोलरची वीज मिळाल्यानं सातत्यानं बील भरलं नाही म्हणून जे संकट येतं त्या उपसा सिंचन योजनांना देखील संकटातून बाहेर काढण्याचं काम राज्य सरकार म्हणून आम्ही करणार आहोत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# पंढरपूरहून सोलापूरला गेला, तिथून बीडला आपल्या घरी; पोलीस ठाण्यात सरेंडर होताच गोपाल बदने ढसाढसा रडला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**सातारा तरुणी डॉक्टर आत्म हत्या प्रकरण आरोपी पीएसआय गोपाल बदने पोलिसांना शरण**

सातारा : फलटणमधील डॉक्टर तरूणीच्या आत्महत्या प्रकरणात अनेक धक्कादायक खुलासे होत आहेत. डॉक्टर आत्महत्या प्रकरणातील आरोप-ीचा काल पंढरपुरात शोध घेतला जात होता. निलंबित पीएसआय गोपाल बदने याचं शेवटचं लोकेशन पंढरपुरात असल्याची माहिती मिळाली होती. काल शनिवारी रात्री गोपाल बदने याचं पंढरपुरात लोकेशन आढळल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर पोलिसांनी त्याचा कसून शोध घेतला होता. काल पहाटेच्या सुमारास प्रशांत बनकर पोलिसांना सापडला, त्याला पुण्यातील त्याच्या मि त्राच्या फार्महाऊसमधून ताब्यात घेतलं त्यानंतर रात्री उशीरा बदने फलटण पोलीस ठाण्यात हजर झाला.

डॉक्टर तरूणीच्या आत्म हत्या प्रकरणातील आर-ोपी गोपाल बदने दोन दिवसात पंढरपूरहून सोलापूरला गेला होता. मग बीडला घरी जाऊन आल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर त्याने काल रात्री उशीरा थेट पोलीस चौकीत हजेरी लावली. बदने सोलापुरा-तील काही पोलिसांच्या सोशल मीडियावरून संपर्कात होता, अशी माहिती समोर आली आहे. बदनेच्या कुटूंबायांना त्याला हजर न झाल्यास नोकरीतून बडतर्फ करणार असल्याचं कळल्यानंतर बदने पोलीस चौकीत हजर झाला अशी माहिती आहे. यासंबंधीचं वृत्त एका वृत्तवाहिनीनं दिलं आहे. दरम्यान, एका वृत्तवाहिनीने दिलेल्या वृत्तानुसार, आत्मसमर्पण केल्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीत पीएसआय बदने याने तोंड उघडलं. तो तपास अधिकाऱ्यांसमोर ढसाढसा रडल्याची माहिती आहे. त्याने आपण महिला डॉक्टरवर कसल्याही प्रकारे अत्याचार केला नाही, असं पोलिसांना सांगितलं आहे. शिवाय त्याने इतरही काही गोष्टी पोलिसांना सांगितल्या. पण संबंधित डॉक्टरसोबत त्याचे काही संबंध होते का? किंवा दोघांच्या संमतीने लैंगिक संबंध ठेवण्यात आले होते का? याबाबत जेव्हा त्याच्याकडे चौकशी करण्यात आली. त्याबाबत बदनेने अद्याप मौन बाळगल्याची माहिती आहे.

**कर्ज काढून लेकीला डॉक्टर केलं**



दरम्यान, गरीब कुटुंबातून आलेल्या या डॉक्टरच्या वडिलांनी कर्ज काढून आणि पैशांची बचत करून आपल्या मुलीला डॉक्टर बनवले होते. दररोज डझनभर मृतदेहांचे शवविच्छेदन करणारी त्यांची मुलगी इतकी निराश आणि हताश कशी झाली या प्रश्नाचं उत्तर कुटुंबाला सापडत नाहीये.

## यात्रा कालावधीत स्वच्छतेला व भाविकांच्या सुलभ दर्शनाला प्राधान्य द्यावे

(पान १ वरून..) भाविकांना सुलभ व सुखकर दर्शन व्ह-ावे यासाठी मंदिर समितीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. पाटबंधारे विभागाने नदीपात्रातील पाणी पातळी नियंत्रित राहील याची दक्षता घ्यावी. तसेच नगरपालिका प्रशासनाने वाळवंटात तात्प-ुरते शौचालय, स्वच्छता, प्रखर प्रकाशव्यवस्था आदी सुविधा उपलब्ध ठेवाव्यात.तसेच चंद्रभागा वाळवंट कायमस्वरूपी स्वच्छ राहील याबाबत शासन स्तरावर नियोजन करण्यात येणार असल्याचेही शिक्षण मंत्री भुसे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आमदार समाधान आवताडे म्हणाले, यात्रा कालावधीत दर्शन रांगेत पाणी साठणार नाही याची दक्षता घ्यावी. वीज वितरण कंपनीने अखंडित वीजपुरवठा करावा, शहरातील सर्व रस्त्यांचे खड्डे बुजवावेत. गर्दी नियंत्रणासाठी एआय टेक्नॉलॉजीचा वापर करावा. आवश्यक ठिकाणी माहिती फलक लावावे, बस स्थानकात स्वच्छता ठेवावी अशा सूचना मांडल्या तर आमदार अभिजीत पाटील यांनी कार्तिकी यात्रा कालावधी मोठ्या प्रम ाणात जनावरांचा बाजार भरतो. त्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध. ठेवाव्यात. शहरा-तील रस्ते सुस्थितीत ठेवावेत. अन्न औषध प्रशासनाने कारवाई बरोबरच स्वच्छतेबाबत दक्षता घेण्याच्या सूचना द्याव्यात असे यावेळी सांगितले.

यावेळी ह.भ.प. जळगावकर महाराज व ह.भ.प राणा महाराज वासकर यांनी प्रदक्षिणा मार्गावर कचकडी नसावी, चंद्रभागा वाळवंट स्वच्छ राहावे तसेच कार्तिक वारी झाल्यानंतर दिंड्या आळंदीकडे जात असतात. यावेळी दिंड्यांना सर्व आवश्यक सुविधा व सुरक्षा उपलब्ध व्हाव्यात. प्रदक्षिणा मार्गावर दिंड्यामध्ये स्पीकर चा वापर केला जातो तो वापर होऊ नये अशी मागणी यावेळी केली.

## फलटण डॉक्टर तरुणी आत्महत्या प्रकरणी निलंबित पीएसआय गोपाल बदनेला ५ दिवसांची पोलीस कोठडी

(पान १ वरून..) आहे ..आरोपी दोनला बळीचा बकरी बनवण्यात आलाय, असा युक्तिवाद आरोपीच्या वकिलांनी केला.

संबंधित डॉक्टरकडे पोलिसांनी अटक आरोपीची वैद्यकीय चाचणी करण्यासाठी नेल्यावर माझ्या ड्युटी मध्ये आरोपी का आणता यावरून वाद झाले होते. २५ जून रोजी परस्परांनी एकमेकांविरोधात तक्रारी केल्या होत्या.त्यावेळी बलात्काराची तक्रार करण्यात आलेली नाही.

आरोपी एक मुळे आत्म हत्येला प्रवृत्त झाल्याचं सुसाईड नोट मध्ये लक्षात येतय.पण जाता जाता आरोपी दोन ला अडकवायचा प्रयत्न म्हणून त्याचं नाव टाकण्यात आलंय. संबंधित पीडितेला बलात्कार झाला असेल तर त्याची वेळ ठिकाण सगळं नोंदवतां आलं असतं पण सुसाईड नोट मधला आरोप वेग आहे, सुसाईड नोटची सत्यताच क्वेशनेबल आहे त्यामुळे मोबाईल जप्त करणे गाडी साठी एक दिवस पुरेसा आहे, असा युक्तिवाद आरोपी गोपाल बदनेच्या वकिलांनी केला.

सरकारी वकिलांनी लॅटिन ट्रमिनॉलॉजी सांगत सुसाईड नोट ही डायिंग डिक्लेरेशन असल्याने सत्य समजल्या जाण्याबाबत अनेक आदेश यापूर्वी झालेत. त्यामुळे त्यावर शंका घेणं हा आरोपीच्या वकीलांचा मुद्दा चुकीचा असल्याचा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला. यावर आरोपीच्या वकिलांनी इंग्रजीमध्ये डायिंग डिक्लेरेशनचा कायदेशीर अर्थ समजावून सांगत एक दिवसाची पोलिस कोठडी द्यावी, सहकार्य करायला तयार आहोत, असं म्हटलं.

# दिवाळीच्या सुट्ट्या संपल्या, चाकरमान्यांचा मुंबई-पुण्याकडे परतीचा प्रवास सुरु



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई-पुणे-कोल्हापूर या दिशांना जाणाऱ्या चाकरमान्यांच्या परतीच्या लोंढ्यामुळे राष्ट्रीय महामार्गावर वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण झाले आहे. पुणे सात-ारा दरम्यान जवळपास ५० किलोमीटरच्या पट्ट्यात वाहनांचा प्रचंड ताण जाणवत आहे.

रुंदीकरणाचे काम अनेक ठिकाणी अपूर्ण आहे, तर काही भागांमध्ये डायव्हर्जन देण्यात आल्यामुळे गाड्यांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.प्रवाशांना तासन्तास गाड्यांमध्ये अडकून राहावे लागत आहे, आणि त्यामुळे नागरिकांचा त्रासही वाढला आहे.

टोलनाक्यांवरही आज संपूर्ण दिवस वाहनांचा दबाव वाढलेला दिसून आला. विशेषतः कोल्हापूरकडून पुणे-मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर दुप-ारपासून मोठी गर्दी झाली आहे.

काही वाहनचालकांनी सांगितलं की, साधारण दोन ते तीन तासांचा प्रवास आज दुप्पट वेळ घेतो आहे.गेल्या दोन तासांपासून आम्ही हायवेवरच आहोत. रांग काही संपत नाहीये. लहान मुलांसोबत प्रवास खूप कठीण झालाय.

**सातारा, पुणे दरम्यान वाहनांची मोठी गर्दी**

प्रशासन आणि महामार्ग प्राधिकरणाकडून काही ठिकाणी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलिस तैनात करण्यात आले आहेत. विशेषतः दिवाळीनंतरच्या या परतीच्या प्रवासामुळे पुढील दोन-तीन दिवस तरी हायवेवरील गर्दी कायम राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दिवाळीनंतरचा परतीचा प्रवास सध्या चाकरमान्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे.रुंदीकरणाचे अपूर्ण काम, वाढलेली वाहनसंख्या आणि व्यवस्थापनातील त्रुटी - या सगळ्यामुळे महामार्गावरील ताण आणखी वाढला आहे.

महामार्ग प्राधिकरण आणि पोलिसांनी पुढील काही दिवस तरी विशेष पथके तैनात करून परिस्थिती नियंत्रणात ठेवावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

# लासलगाव जिप गटातुन आरती निकाळे यांच्या उमेदवारीसाठी वनसगावकर एकवटले



निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्रभर निवडणुकीचे वारे होऊ लागले असून लासलगाव गटाच्या निवडणुकीसाठी अनेक मातब्बर रिंगणात होते परंतु लासलगाव गटाकडे अवघ्या नाशिक जिल्ह्याची लक्ष लागून असलेले असताना लासलगाव गट आरक्षित निघाल्याने मातबरांच्या मनसुब्यांवर पाणी फिरले आहे. लासलगाव गट वीस वर्षानंतर पुन्हा एकदा आरक्षित झाल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत या निवडणुकीत लासलगाव गटातून वनसगाव चे भूमिपुत्र

तसेच माणुसकी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सागर प्रल्हाद निकाळे यांनी आपली धर्मपत्नी सौ आरती निकाळे

**पाठिंबा देत विजयी करण्याचा निश्चय; गट तट व स्थानिक हेवेदावे विसरून सर्व ग्रामस्थ व नेते एकाच व्यासपीठावर**

यांच्या उमेदवारीसाठी प्रयत्न केले सुरू केले असून सर्वप्रथम वनसगाववासियांची मत जाणण्यासाठी व त्यांच्याशी विचार विनिमय करून त्यांच्या निर्णयावर उम ेदवारी लढविण्याचा चंग बांधला आहे या निमित्ताने वनसगाव येथे सहविचार सभा घेण्यात आली या सहविचार सभेच्या अध्यक्षस्थानी हरे कृष्ण बाबांचे अनुयायी मुरलीधर बहीरुनाथ शिंदे होते.

यावेळी सर्वप्रथम सागर निकाळे यांनी आपल्या मनोगतातून मी आपल्याकडे संवाद साधण्यासाठी आलो असून तुम्ही जो निर्णय द्याल तो मला मान्य आहे यावेळी त्यांनी सर्वांना तुम्ही सर्वांनी एकमुखी पाठिंबा दिला तर मी निवडणुकीसाठी सौ आरती निकाळे यांची उमेदवारी करेल असे मनोगत व्यक्त केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सुनील मापारी, लासल-गाव खरेदी विक्री संघाचे संचालक प्रकाश कापडी ,माजी सरपंच उत्तमराव शिंदे सेवानिवृत्त प्राचार्य पी वाय कडाळे सर, तंटामुक्तीचे अध्यक्ष एकनाथ दादा शिंदे, सेवानिवृत्त पर्यवेक्षक दौलत शिंदे सर ,गणेश बँकेचे उपाध्यक्ष

**वनसगांव व पंचक्रोशी ग्रामस्थांकडुन जो प्रतिसाद मिळाला तो निश्चितपणे अविस्म रणीय राहील सर्वांच्या भाननेचा आदर ठेवुन निवडणुकीला सामोरे जाणार आहे सर्वांगीण विकासाला प्रथम प्राधान्य देणार असुन मतदारांच्या विश्वाला तडा जाऊ देणार नहि आपण दिलेली जबाबदारी निश्चितच यशस्वीपणे पार पाडेल.**

**- सौ.आरती सागर निकाळे (वनसगांव)**
**इच्छुक उमेदवार,लासलगाव गट**

उन्मेष डुंबरे, वनसगाव विकास संस्थेचे मा चेअरमन मधुकर आप्पा शिंदे, विद्यमान चेअरमन धनंजय डुंबरे, रामदास जावळे आदींनी मनोगत व्यक्त केले . यावेळी प्रत्येकाने आपापल्या मनोगता-तून आलेल्या सुवर्णसंधीचा फायदा करून घेण्यासाठी सौ आरती निकाळे यांनी उमेदवारी करावी तसेच गावातील गट तट विसरून सर्वांनी एकत्रित येऊन काम करू असे आश्वासन दिले. ज्यावेळी प्रत्येकाने आपल्या मनोगत आतून सकारात्मक विचार मांडून आगामी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या व पाठिंबा दिला आहे. एकंदरीत सर्व बाबीचा विचार करता वनसगाव व परिसरातील मतदारांनी सौ आरती निकाळे यांच्या निवडून आणण्याच्या तयारीला आम्ही पक्ष कुठलाही असो सर्वतोपरी सहकार्य करू असे आश्वासित केले.गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सौ आरती निकाळे यांच्या उमेदव-ारीवर शिक्कामोर्तब केले असून सर्वांनी यावेळी एकमुखी पाठिंबा दिला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# कार्तिकी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे २४ तास दर्शन सुरू

## सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : दरवर्षी कार्तिकी यात्रेला भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, यात्रा कालावधीत चांगला मुहुर्त व दिवस पाहून श्रींचा पलंग काढून भाविकांना २४ तास दर्शन उपलब्ध करून देण्यात येते. यावर्षी दिनांक २६ ऑक्टोंबर रोजी चांगला दिवस असल्याने विधिवत पुजा करून श्रींचा पलंग काढण्यात आला आहे. विठ्ठलाच्या मूर्तीच्या पाठीशी लोड; तर रुक्मिणी मातेच्या मूर्तीच्या पाठीशी तक्क्या देण्यात आला आहे. त्यामुळे श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचे २४ तास दर्शन सुरू राहणार असल्याचे मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगीतले.





श्रींचा पलंग काढल्याने काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती आदी राजोपचार बंद होवून नित्यपुजा, महानैवेद्य व गंधाक्षता हे राजोपचार सुरू राहतील. दिनांक ०९ नोव्हेंबर (प्रक्षाळपुजा) पर्यंत २४ तास दर्शन उपलब्ध असणार आहे. श्रींचा पलंग काढताना पुजेवेळी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य शकुंतलाताई नडगिरे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगावकर), ड माधवीताई निगडे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख संजय कोकीळ, अतुल बक्षी व पौरोहित्य करणारे कर्मचारी उपस्थित होते.

दर्शनरांगेत मोठ्या प्रमाणात भाविक आहेत, या भाविकांचे लवकरात लवकर दर्शन होण्यासाठी दर्शनरांग जलद व द्रुतगतीने चालविणेकामी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. परंपरेनुसार श्रींचा पलंग काढल्याने दैनंदिन २४ तास मुखदर्शन व २२.१५ तास पदस्पर्शदर्शन उपलब्ध होत आहे. याशिवाय, मंदिर समितीच्या संकेतस्थळावरून व जागोजागी एलईडी टिव्हीद्वारे लाईव्ह दर्शन उपलब्ध करून देण्यात येत आहे. संपूर्ण यात्रा कालावधीत भाविकांच्या हस्ते होणा-या पुजा व व्हीआयपी दर्शन बंद ठेवण्यात आलेले आहे. तसेच या यात्रा कालावधीतील श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिराशी संबंधित असलेल्या प्रथा व परंपरांचे कटाक्षपणे पालन करण्यात येत असून, श्रींचा पलंग काढणे, एकादशीच्या सर्व पुजा, महानैवेद्य, श्रींच्या पादुकांची मिरवणूक, महाद्वार काला, प्रक्षाळपुजेचे योग्य ते नियोजन करण्यात आल्याचे यावेळी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

**मागील आषाढी यात्रेदरम्यान भाविकांच्या गर्दीचा अनुभव लक्षात घेऊन, यंदाच्या कार्तिकी यात्रेचे नियोजन करण्यात आले आहे. दर्शन रांगेच्या व्यवस्थेवर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले असून भाविकांना सुलभ, सुव्यवस्थित आणि जलद दर्शनाची सुविधा मिळावी यासाठी प्रशासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.**

**– राजेंद्र शेळके (कार्यकारी अधिकारी)**

# पडघ्यात दिवाळी पहाट मोठ्या उत्साहात




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे दिवाळी सणानिमित्त आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

पडघा सांस्कृतिक मंच यांच्या वतीने दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन रुचीरा हॉटेलच्या बाजुला बाजारपेठ पडघा येथे बुधवारी करण्यात आले होते.

यावेळी प्रसिद्ध भजन सम्राट ह. भ. प. वैभव मंडलिक व त्यांच्या सहकाऱ्यांनी भक्तीगीते, भावगीते सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. तर सांस्कृतिक मंचाच्या वतीने आयोजित रांगोळी व किल्ला स्पर्धेच्या प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना सन्मानचिन्हे व रोख पारितोषिक व किल्ले स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्वांना सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले.

तर कार्यक्रमासाठी उपस्थित विविध मान्यवरांचा शाल ,श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना नेते प्रकाश पाटील, उद्योजक पंडीत पाटील, मनसे भिवंडी लोकसभा जिल्हाप्रमुख शैलैश बिडवी, सरपंच रविंद्र विशे शिवसेना विधानसभा संघटक मनोहर ठाकरे, कृषी बाजार समितीचे माजी सभापती डॉ. संजय पाटील, दिनेश गंधे, अशोक शेरेकर, संजय पटेल, अक्षय भोईर, सचीन बिडवी, आंनद गुप्ता, नितीन चंदे, जयेश जाधव, ग्रामपंचायत सदस्य, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले.

# प्रभाग क्रमांक ३ मधुन अण्णासाहेब गायकवाड निवडणुकीच्या रिंगणात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे,धाराशिव शहरातील प्रभाग क्रमांक ३ मधील पोलीस लाइन बँक कॉलनी पोस्ट कॉलनी परिसरात अण्णासाहेब गायकवाड हे चर्चित नाव त्यांचे आजोबा तथा त्यांचे वडील व आई पोलीस कर्मचारी असल्या मुळे सेवा भाव हाच त्यांचा धर्म पारीवारीक स्नेहा मुळे जीव लावलेला जनसंपर्क हक्काची माणसे ही त्यांची शिदोरी या भागातील २ टर्म नगरसेवक राहिलेले शिवसेना गट नेते राजा भाऊ पवार यांचे ते खंदे विश्वासू समर्थक पार दोन वेळेस प्रतिकूल परिस्थितीत राजा भाऊ पवार यांना निवडून आणण्यासाठी अण्णासाहेब जिवाचे रान केले आज रोजी प्रभाग क्रमांक ३ मध्ये एक जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी व दुसरी जागा एससी प्रवर्गासाठी सुटली असून अण्णासाहेब गायकवाड यांच्या घरातील महिला प्रभागातील जनतेच्या सेवेसाठी निवडणूक लढविणार आहेत मागील १५ वर्षा पासुन अण्णासाहेब गायकवाड हे नगरसेवक राजाभाऊ पवार यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना आजच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात कार्यरत आहेत त्यामुळे महिला प्रवर्गातून त्यांना उमेदवारी मिळेल यात शंका नाही



अण्णासाहेब गायकवाड हे युवा वर्गातील आकर्षण असून हाकेला धावून जाणारा नेता ही त्यांची पूर्ण धाराशिव शहरात प्रतिमा आहे व जनतेच्या अडचणीत त्या सोडविण्यासाठी अग्रभागी असणार्या समाजसेवकाला नगर परिषद निवडणुकीत निवडून द्यावे असा मतप्रवाह आहे प्रभाग क्रमांक ३ मध्ये राजा भाऊ पवार व अण्णासाहेब गायकवाड यांची पकड असल्या मुळे या ही निवडणुकीत ते प्रभागातील जनतेची पसंत राहणार यात शंका नाही.

# श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास २ लक्ष रूपयाची देणगी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास कौशल्या केंद्रे व शिवाजी केंद्रे यांनी दोन लाख रुपयेची देणगी दिल्याची माहिती मंदिर समितीचे प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली. त्याबद्दल देणगीदार दांपत्यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर) यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची प्रतिमा व उपरणे देऊन येथोचित सन्मान केला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते.

कौशल्या शिवाजी केंद्रे व शिवाजी भीमराव केंद्रे हे देणगीदार दांपत्य आज श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी सदरची देणगी मंदिर समितीच्या अन्नछत्रास दिली असून, ते लोहा जिल्हा नांदेड येथील रहिवासी आहेत व श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे निस्सिम भक्त आहेत. दरवर्षी कार्तिकी यात्रेला श्रींच्या दर्शनासाठी येत असतात. मागील वर्षीच्या कार्तिकी यात्रेला देखील त्यांनी एक लाख रूपयाची देणगी दिली होती.



सद्यस्थितीत, कार्तिकी यात्रेचा कालावधी सुरू असल्याने भाविकांची गर्दी होत आहे. त्यामुळे भाविकांकडून देणगी प्राप्त करून घेण्यासाठी स्वयंसेवी संस्थेची मदत घेण्यात येत आहे, जादा स्टॉल उभारण्यात करण्यात आले आहेत. याशिवाय, ऑनलाईन देणगीसाठी आरटीजीएस, क्यूआर कोड, संकेतस्थळ व मोबाईल पची देखील सुविधा आहे. इच्छुक भाविकांना देणगी द्यावयाची असल्यास, त्यांनी श्री संत तुकाराम भवन येथील देणगी कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने यावेळी श्री राऊत यांनी केले.

# श्री सरस्वती विद्यालय रामेश्वर, लातूर मध्ये २५ वर्षानंतर रंगला ६० जणांचा अनोखा स्नेह मेळावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर/प्रतिनिधी : सरस्वती विद्यालय रामेश्वर,लातूर, येथील सन.१९९९- २००० सालच्या दहावी च्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा अत्यंत उत्साहात पार पडला, मार्च २००० मध्ये दहावीची परीक्षा दिल्यानंतर सर्वांनी आपापल्या दिशेने मार्गक्रमण केले. त्या प्रवासात अनेकांनी यश, संघर्ष आणि चढउतार अनुभवले; पण आज २५ वर्षांनंतर पुन्हा शाळेच्या प्रांगणात भेटल्यावर प्रत्येकाच्या डोळ्यात आनंदाश्रू होते. तो क्षण शब्दात व्यक्त करणे प्रत्येकासाठी अवघड होते.

धकाधकीच्या आयुष्यात सर्वजण आपल्या कामात व्यस्त असले तरी शाळेच्या आठवणी कायम मनात असल्याचे अनेक विद्यार्थ्यांनी सांगितले.

या वेळी मुख्याध्यापक प्राचार्य नागरगोजे सर यांनी मनोगतात सांगितले की, सर्व माजी विद्यार्थी निरोगी राहा, एकमेकांच्या गरजेच्या वेळी उपयोगी पडा.आता तुम्ही सर्व पालकाच्या भूमिकेत आहात आणि तुमची जबाबदारी वाढली आहे. समाजाच्या सर्व स्तरात यशस्वी विद्यार्थी हीच श्री सरस्वती विद्यालय रामेश्वर यांची खरी ओळख आहे, असे ते म्हणाले.

दहावी च्या बॅचमधील अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या स्वबळावर उद्योग उभे केले, तर काहीजण राजकारणातही पुढे गेले आहेत. काहीजणी पत्रकार, शिक्षक,आदर्श शेतकरी, व्यापारी, नोकरदार, तर काही गृहिणी असून सर्वगुणसंपन्न माजी विद्यार्थ्यांचा हा मेळावा दिवाळीच्या आनंद पर्वणीसारखा ठरला,

२५ वर्षांनंतर एकत्र आलेल्या मित्रांनी शाळेतील गमती-जमती, शिक्षकांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत एकमेकांसोबत क्षण साजरे केले.या कार्यक्रमाला विद्यालयाचे मु.अ. प्राचार्य श्री नागरगोजे बी. एल. यांचे नियोजना नुसार व पर्यवेक्षक श्री लाड एस. पी., माजी मु.अ/प्राचार्य श्री शेप बी. एम.व श्री सोनवणे व्ही.आर. गायकवाड सर,संजय केंद्रे सर, चिलवंत सर, पांचाळ सर , दहिफळे सर यांचे उपस्थितीत यांच्यासह इतर शिक्षक उपस्थित होते. सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे समाजातील योगदान कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

या मेळाव्यास दहावी बॅचचे सुमारे ६० विद्यार्थी उपस्थित होते. प्रत्येकाने आपल्या क्षेत्रात वेगळी छाप उमटवली असून, त्यांचा अभिमान असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रमाचे आयोजन श्री. सरस्वती विद्यालय रामेश्वर प्रांगणात करण्यात आले होते. गीत-संगीत, नाट्यछटा, मिमिक्री, विनोदी केबीसी,डायलॉग आणि नृत्य सादरी करणांमुळे वातावरण रंगतदार झाले. जुन्या काळातील प्रसंग आणि शिक्षकांच्या आठवणींनी सर्वांना पुन्हा २५ वर्षां पूर्वीच्या काळात नेले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम बोंदर यांनी केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश खेडकर यांनी केले तर आभार प्रदर्शनाने अमोल गोळवे यांनी समारोप केला.

## नाग फाउंडेशच्या टीमने केले नैसर्गिक अधिवासात मुक्त

## नैसर्गिक शेतीतून शाश्वत कृषी क्रांती होईल

# गोकुळ शुगर इंडस्ट्रीज धोत्री येथे साडेसात फूटी अजगराचे यशस्वी रेस्क्यू ऑपरेशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर /प्रतिनिधी : सोलापूरजवळील धोत्री (ता. दक्षिण सोलापूर) येथील गोकुळ शुगर इंडस्ट्रीज लिमिटेड परिसरात दिनांक १९ ऑक्टोबर रोजी तब्बल ७.५ फूट लांबीचा अजगर आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. कंपनीतील सुरक्षा अधिकारी श्री. विद्वान गजधाने यांना हा अजगर सर्वप्रथम दिसला. त्यांनी तात्काळ स्थानिक सर्पमित्र नागेश बिराजदार यांना या घटनेची माहिती दिली. स्थानिक सर्पमित्रांनी घटनास्थळी पोहचून या सापास ताब्यात घेतले. अजगर हा साप प्रथमच त्यांना आढळून आल्याने त्यांनी याची माहिती सोलापूरचे सर्प अभ्यासक राहुल शिंदे यांना दिली. माहिती मिळताच राहुल शिंदे व नाग फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल अलदार व टीमने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सापाची अधिक पाहणी केल्यावर हा साप सुदृढ असल्याचे निश्चित झाले. यावेळी स्थानिक सर्पमित्र राजकुमार बिराजदार, अमोल बिराजदार, मल्लिकार्जुन हीरोळे आणि नागेश बिराजदार यांनी या रेस्क्यू ऑपरेशनमध्ये मोलाची मदत केली. सोलापूर जिल्ह्यात अतिशय दुर्मिळ असणारा हा साप असून हा वन्यजीव अधिनियम १९७२ च्या कायद्याअंतर्गत अनुसूची १(शेड्युल १) मध्ये समाविष्ट असल्याने याला एखाद्या वाघा ईतकेच संरक्षण प्राप्त होते. यामुळे या घटनेची माहिती सहाय्यक उपवनसंरक्षक अजित शिंदे, वन परिक्षेत्र अधिकारी प्रवीण गांगुर्डे आणि वनरक्षक श्रीशैल पाटील यांना कळविण्यात आली व त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे रेस्क्यू ऑपरेशन अत्यंत सुरक्षितपणे पार पडले. सर्पमित्रांनी अतिशय काळजीपूर्वक या अजगराला पकडले आणि त्याला तात्काळ त्याच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे मुक्त करण्यात आले. यावेळी गोकुळ शुगर्सचे रावसाहेब गदादे, अरविंद जंगाले व कर्मचारी तसेच वनसेवक बसवराज हिरोळे आणि सोलापूरचे सर्पमित्र संतोष धाकपाडे व शिवानंद हिरेमठ हेही उपस्थित होते.

**अजगर हा साधारणपणे जंगले, खडकाळ प्रदेश, नदीकाठचे घनदाट झुडपे किंवा शेताजवळील उसाच्या लागवडीमध्ये उष्णता आणि लपण्यासाठी जागा शोधत असतो. सोलापुरात मागच्या महिन्यात आलेल्या पुरामुळे अजगरांसारख्या प्राण्यांचे स्थलांतर झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय सोलापुरात अजगर आढळल्याची नोंद बोटावर मोजण्याइतकी असली तरी धोत्री आणि करजगी या भागाचा अभ्यास केल्यास, भीमा नदीचा परिसर आणि तेथील नैसर्गिक वनांमुळे या सापांना अनुकूल अधिवास मिळतो. वनविभागाने या घटनेची तत्परता दाखवत आमच्या टीमला तात्काळ सहकार्य केल्याने हा अजगर मानवी हद्दीतून त्वरित त्याच्या नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यास जलदगती मिळाली.**

**सर्प अभ्यासक राहुल शिंदे, सोलापूर**

**हा साडेसात फुटी अजगर खूपच मोठा आणि सशक्त होता. गोकुळ शुगर इंडस्ट्रीज पासून धोत्री गाव २ किलोमीटरवर असून मानवी वस्तीजवळ तो आल्याने त्याला तात्काळ रेस्क्यू करणे आवश्यक होते. अशा मोठ्या सापाला पकडताना त्याच्या सुरक्षिततेला आणि पकडणाऱ्या व्यक्तीच्या सुरक्षिततेला महत्त्व देणे गरजेचे असते. आमच्या टीमने या अजगरास अत्यंत शांतपणे आणि शास्त्रीय पद्धतीने रेस्क्यू करून तेथील उपस्थिनांमध्ये सापांबद्दल जनजागृती करण्यात आली. सापाला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडल्यामुळे पर्यावरणाचे संतुलन राखले जाईल.**

**अनिल अलदार, अध्यक्ष, नाग फाउंडेशन**

**अजगर हा भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ च्या शेड्यूल ख (अनुसूची १) मध्ये समाविष्ट असलेला अत्यंत महत्त्वाचा आणि संरक्षित प्राणी आहे. या कायद्यामुळे अजगराला मारणे, पकडणे किंवा त्याचा छळ करणे हा गंभीर गुन्हा आहे. पर्यावरणातील उंदिर, घुस आणि लहान सस्तन प्राण्यांवर नियंत्रण ठेवणारा हा प्राणी अन्नसाखळीतील एक महत्त्वाचा घटक आहे. गोकुळ शुगर इंडस्ट्रीज व्यवस्थापन, रावसाहेब गदादे व अरविंद जंगाले, वनसेवक बसवराज हिरोळे तसेच सर्प अभ्यासक राहुल शिंदे आणि नाग फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल अलदार यांच्या संपूर्ण टीमने रेस्क्यू ऑपरेशन यशस्वी पार पाडले याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो.**

**श्रीशैल पाटील वनरक्षक, सोलापूर.**



# नाईकबंबवाडी औद्योगिक वसाहतीत 'मेगा प्रोजेक्ट' देऊ : मुख्यमंत्री

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १ हजार ३५२ कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा/प्रतिनिधी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते फलटण येथे नीरा देवघर प्रकल्पाच्या उजवा मुख्य कालवा दुसऱ्या टप्प्याच्या शुभारंभासह १ हजार ३५२ कोटी रुपये रकमेच्या विविध विकासकामांचे ऑनलाइन भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. फलटण शिंगणापूर रस्त्यावरील नाईकबंबवाडी येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीमध्ये एक मोठा (मेगा) औद्योगिक प्रकल्प देण्यासह तालुका व परिसरातील विविध विकास कामे सुरू करण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

फलटण येथे आयोजित भूमिपूजन कार्यक्रमात व शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री शंभूराजे देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर आदी उपस्थित होते.

फलटण ही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक भूमी असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, शासनाने या परिसराला दुष्काळमुक्त करण्यासाठी नीरा देवघर कालव्याच्या कामातील अडचणी दूर करून कामाला सुरुवात केली आणि प्रकल्पाचे पाणी फलटण आणि माळशिरसला देणे शक्य करून दाखविले आहे. माणदेशातील साहित्य दुष्काळावर आधारित होते, हा दुष्काळ दूर करण्याचे काम शासनाने हाती घेतले असून सर्व कामे पूर्ण झाल्यावर हरित माणदेश तयार करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

दुष्काळमुक्ती हाच ध्यास

मुख्यमंत्री म्हणाले, नीरा देवघर, जिहे कटापूर, टेंभू उपसा योजनेचे वेगवेगळे टप्प्यातून दुष्काळी तालुक्यांना पाणी दिले आहे. सांगोल्यासारख्या दुष्काळी भागात पाणी पोहोचविण्यात आले आहे. माळशिरस तालुक्यातील पाण्यापासून वंचित २२ गावांना पाणी देण्यात येईल. नीरा देवघर प्रकल्पातील तीन उपसा सिंचन योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. या परिसराच्या विकासासाठी आणि दुष्काळमुक्तीसाठी शासन इथल्या जनतेच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**फलटण परिसराचा सर्वांगीण विकास करणार**

श्री. फडणवीस पुढे म्हणाले, जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या सर्व सुविधा फलटण शहरात आल्या आहेत. प्रशासकीय इमारत, पोलीस ठाणे, न्यायालय आदींच्या माध्यमातून नागरिकांचे जीवन सुकर होणार आहे. येथील विविध विकास कामांना चालना दिली जाईल, असेही त्यांनी सांगितले.



महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून पाडेगाव - साखरवाडी - जिंती - फलटण - शिंगणापूर रस्ता करण्यात येईल. माणगंगा नदीचा समावेश अमृत २ मध्ये करण्यात येईल आणि फलटण येथे न्यायालयासाठी स्वतंत्र इमारत उभारण्यात येईल. फलटण येथील विमानतळाच्या अनुषंगाने सर्वेक्षण करण्यात येऊन काम शक्य असल्यास करण्यात येईल. फलटण येथील रुग्णालयातील सुविधा अद्ययावत करण्यात येतील, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

सामान्य माणूस आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी शासन कार्यरत आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजना आणि शेतकऱ्यांची वीज बील माफीसारखी योजना बंद होणार नाही. सौर ऊर्जा प्रकल्प पूर्ण झाल्यावर शेतकऱ्यांना दिवसा वीज मोफत देण्यात येईल तसेच राज्यातील सर्व उपसा सिंचन योजना सौर ऊर्जेवर नेण्यात येतील, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

ग्रामविकासमंत्री श्री.गोरे म्हणाले, फलटण परिसराच्या दुष्काळ मुक्तीसाठी शासनाने महत्वाचे निर्णय तसेच प्रकल्प हाती घेतले आहेत. माण, खटाव आणि फलटण परिसरातील दुष्काळ त्यामुळे दूर होणार आहे. नीरा देवधर प्रकल्पाच्या उजव्या कालव्याची कामे हाती घेण्यात आली आहेत. अनेक योजना मार्गी लागत असून फलटणच्या विकासाचा मार्ग त्यामुळे खुला झाला आहे. उद्योग, वाहतूक आदी क्षेत्रातही विकासाला चालना मिळाली आहे, असे त्यांनी सांगितले.

आमदार सचिन पाटील यांनी आपल्या मनोगतात फलटण तालुक्यात अनेक विकासकामे होत असल्याचे नमूद केले.

माजी खासदार श्री. नाईक निंबाळकर यांनी आपल्या मनोगतात तालुका व परिसरात झालेल्या व हाती घेण्यात आलेल्या विकासकामांविषयी माहिती दिली.

जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शुभारंभ, लोकार्पण होणाऱ्या विविध विकासकामांची माहिती दिली. या १ हजार ४०० कोटी रुपयांच्या विकासकामांमुळे येथील शेती आणि उद्योग क्षेत्राला चालना मिळेल व परिसराचा सर्वांगीण विकास होईल. नीरा देवधर उजव्या कालव्याच्या दुसऱ्या टप्प्यातील कामामुळे १२ हजार हेक्टर क्षेत्रातील शेतीला फायदा होऊन शेतकऱ्याच्या जीवनात समृद्धी येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष महेश शिंदे, आमदार सचिन पाटील, मनोज घोरपडे, अतुल भोसले, राहुल कुल, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, माजी आमदार राम सातपुते आदी उपस्थित होते.

**कार्यक्रमात झालेल्या विविध विकास कामांचे भूमिपूजन, शुभारंभ व लोकार्पण :**

नीरा देवघर प्रकल्प उजवा मुख्य कालवा टप्पा २ किमी ८७ ते १३४ पर्यंत बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचे काम करणे (लाभ क्षेत्र १२ हजार ३१४ हे.) कामाचा कार्यारंभ- निविदा किंमत ९६७ कोटी रुपये

प्रशासकीय भवन या नवीन इमारतीच्या कामाचा भूमिपूजन तथा कार्यारंभ सोहळा - रक्कम १८ कोटी ६९ लाख रुपये

महसूल भवन या नवीन इमारतीच्या कामाचा भूमिपूजन तथा कार्यारंभ सोहळा - रक्कम ९ कोटी ७५ लाख रुपये

फलटण शहरांतर्गत होणारा नवीन कॉंक्रिट पालखी मार्ग कामाचा कार्यारंभ -रक्कम ७५ कोटी रुपये

प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत मंजूर असणाऱ्या २० कोटी निधीचा ३ रस्त्याच्या कामाचा कार्यारंभ.

आसू-फलटण-गिरवी या एम.एस.आय.डी.सी. योजनेतून सुरू असणाऱ्या एकूण ५० कि. मी. लांबीच्या व १९८ कोटी रुपये किमतीच्या कॉंक्रिट रस्त्याच्या कामापैकी फलटण ते गिरवी या पूर्णपणे बांधून झालेल्या रस्त्याचे लोकार्पण.

फलटण शहर पोलीस ठाणे, फलटण ग्रामीण पोलीस ठाणे, तसेच वाठार स्टेशन येथे बांधण्यात आलेल्या नवीन पोलीस ठाणे इमारतींचे लोकार्पण - किंमत प्रत्येकी १२ कोटी २८ लाख ३६ हजार ९३२ रुपये (९ हजार ५०० स्के. फूट)

फलटण येथे बांधण्यात आलेल्या ८७ पोलीस कर्मचारी निवास इमारतींचे लोकार्पण- रक्कम २७ कोटी ११ लाख ४८ हजार ६७७ रुपये (८० हजार स्के. फूट)

कार्यक्रमात विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात लाभ प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. यात पी. एम. जनमन योजनेंतर्गत घरकुल लाभ, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ प्रमाणपत्र, फळबाग लागवड व सेंद्रिय शेतीमध्ये उत्कृष्ट कामाबद्दल सन्मान, उत्कृष्ट बचत गट, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान यांना सन्मानित करण्यात आले.

---

# स्वेरीच्या इ. अँड टी.सी. विभागात दोन आठवड्यांची कार्यशाळा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट् संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागात 'पीसीबी डिझाईन आणि डेव्हलपमेंट' या विषयावर तब्बल १२ दिवसांची कार्यशाळा संपन्न झाली. तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी ही कार्यशाळा ऑफलाइन मोडमध्ये या विभागात घेण्यात आली.

संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार व विभागप्रमुख डॉ. सुमंत आनंद यांच्या नेतृत्वाखाली ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ही कार्यशाळा सॉफकॉन् इंडिया प्रा. लि., पुणे च्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. शुभम शर्मा आणि शिवम मिश्रा हे तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून या कार्यशाळेत उपस्थित होते. डॉ. सुदेम डॅमरि यांनी या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून काम पाहिले. कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना प्रिंटेड सर्किट बोर्ड (पीसीबी) डिझाईन आणि निर्मिती याबद्दल सखोल ज्ञान देणे हा होता. कार्यशाळेच्या सुरुवातीला पीसीबी चे प्रकार, त्याचा स्तर तसेच साहित्य आणि घटकांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना अल्टीअम सॉफ्टवेअर वापरून स्कीमॅटिक आणि लेआउट डिझाईन शिकवण्यात आले. हाताळणी सत्रांमध्ये स्कीमॅटिक डिझाईन, नेटलिस्ट तयार करणे, फुटप्रिंट असाइन करणे, एरर चेकिंग या बाबींचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी पूर्ण-वेव ब्रिज रेक्टिफायरसह एसी ते डीसी कन्व्हर्टर आणि टायमर व सीडी ४०१७ आधारित एलइडी चेसर सर्किट यांसारख्या प्रॅक्टिकल सर्किटवर काम केले. त्यानंतर घटकांची मांडणी, राउटिंग तंत्र, लेअर स्टॅकअप, ग्राउंड प्लेन, इआरसी/ डीआरसी तपासणी, जेरबर फाइल जनरेशन, बीओएम तयार करणे आणि थ्रीडी डिझाईन रिव्ह्यू यासारख्या प्रगत विषयांचा उहापोह करण्यात आला. विद्यार्थ्यांना पीसीबी निर्मिती प्रक्रिया जसे की एचिंग, सोल्डर मास्क, सिल्कस्क्रीन, व्हाया प्लेटिंग, असेंब्ली तंत्रज्ञान (एसएमटी व टीएचटी) आणि पीसीबी टेस्टिंग पद्धती याबद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यशाळेचा समारोप मिनी-प्रोजेक्ट ने झाला, जिथे विद्यार्थ्यांनी स्कीमॅटिक्स डिझाइन करणे, पीसीबी लेआउट तयार करणे, जेरबर फाइल्स जनरेट करणे आणि मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली प्रोजेक्ट अंतिम रूपात सादर केले.

विद्यार्थ्यांनी आपले प्रोजेक्ट रिपोर्ट पाच जणांच्या गटात सादर केले. ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली, ज्यामुळे पीसीबी डिझाईन आणि डेव्हलपमेंट मधील कौशल्ये प्रभावीपणे विकसित झाली. या कार्यशाळेत जवळपास १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. डॉ. नीता कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

---

# खरोसा नवभारत विद्यालयात २००७च्या दहावी बॅचचा स्नेह मेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधि/अमर जाधव




औसा तालुक्यातील खरोसा येथील नवभारत विद्यालयातील २००७ दहावी बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा आयोजीत करण्यात आला होता .२००७ च्या दहावी वर्गातील माजी विद्यार्थ्यांनी दिपावलीचे औचित्य साधुन स्नेह मेळावा आयोजीत केला होता या मेळाव्यासाठी बाहेरगावी असलेले मित्र मैत्रिणी जमा होउन गेल्या १९/ वर्ष आधीच्या आठवणींना उजाळा दिला .मैत्रीच्या

आठवणींच्या गंधाने आणि भावनांच्या ओलाव्याने भारलेला एक आगळावेगळा दिवस...नवभारत विद्यालय,खरोसा येथे २००७च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा हा सोहळा मोठ्या उत्साहात आणि प्रेमळ वातावरणात पार पडला.

एकेकाळी एकत्र बाकावर बसलेले, एकत्र स्वप्ने पाहणारे मित्र आज आयुष्याच्या विविध वाटांवर यशस्वी झाले असले तरी, शाळेच्या आठवणींनी सगळ्यांना पुन्हा त्या बालपणीच्या दुनियेत नेलं. जुन्या किस्स्यांनी, शिक्षकांच्या आठवणींनी, आणि शाळेच्या प्रत्येक कोपऱ्यात दडलेल्या त्या सोन्याच्या क्षणांनी सगळ्यांना भारावून टाकलं

.यास्नेहमेळाव्याच्या निमित्ताने शाळेच्या १९/ वर्षांच्या गौरवशाली प्रवासाचा उत्सव साजरा केला,

खरोसा सह परिसरातील असंख्य विद्यार्थी या शाळेत शिकून आज विविध क्षेत्रात आपल नावलौकीक करत आहेत. त्यांना पुन्हा एकत्र आणण्याचा हा संकल्प ऐकून प्रत्येकाच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी एकमुखाने शाळेच्या प्रगतीसाठी, एकतेसाठी आणि नव्या पिढीला प्रेरणा देण्यासाठी सतत कार्यरत राहू असा संकल्प केला.

यावेळी मुख्याध्यापक परमेश्वर स्वामी ,प्रमुख पाहुने एन. पी. डोके,माजी मुख्याध्यापक शेषेराव बिराजदार ,भातमोडे सर,औरादे सर,नवखंडे सर,कावरे सर.कोळपे सर,पाटील सर,सुलतानपुरे सर,स्वामी सर ,शिदोरे सर,मसाडे सर ,खरपडे संभाजी ,अमरेश्वर डोके, सह माजी विद्यार्थी

विशाल तोडकर, अली शेख ,सचिन नरवटे, बाळासाहेब डोके अनिशा शेख ,शिवलीला स्वामी ,बजरंग पाटील, मुकेश सोरडे ,राम होगले, सचीन मुसांडे .प्रदिप जाधव .सुनील माळी.रमाकांत मुसांडे. वर्षा माळी.शितल पाटील.जनाबाई जाधव. उषा मुसांडे. अल्का पवार.मणिषा पाटील.अनिल होगले.नरेंद्र सारोळे.सह माजी विद्यार्थी व नवभारत चे शिक्षकवृद उपस्थीत होते.

---

# महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्या, पुणे जिल्हा अध्यक्षपदी अविनाश शेंडगे यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड

केडगाव चौफुला येथील श्री दत्त मंगल कार्यालमध्ये पुणे जिल्हा अध्यक्ष व कार्यकारिणी तशेच राज्य कार्यकारिणी पदाधिकारी निवड कार्यक्रम दौड चे लोकप्रिय आमदार राहुलदादा कुल यांच्या उपस्थितीत व राज्य अध्यक्ष बाळासाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला.समाजहित आणि गावांच्या

शांततेसाठी, न्याय व्यवस्थेच्या प्राथमिक पातळीवर पोलीस पाटील वर्ग अतिशय जबाबदारीने काम करतो. हा वर्ग शासन आणि नागरिक यांच्यातील महत्वाचा दुवा असून त्यांचे कार्य गावांच्या सामाजिक समतेच्या जपणुकीसाठी मोलाचे आहे असे प्रतिपादन दौंड चे आमदार राहुल कुल यांनी केले आहे.

आमदार राहुल कुल म्हणाले की, ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्थेच्या बळकटीसाठी पोलीस पाटील वर्गाचे अमूल्य योगदान आहे. पोलीस पाटलांच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी मी सातत्याने शासन स्तरावर पाठपुरावा करत आहे. पूर्वी असलेले ६५०० रुपये मानधन वाढवून पोलीस पाट लांना दरमहा १५,००० रुपये मानधन मिळण्यासाठी आमदार साहेबांचा शिंहाचा वाटा आहे. पुढील काळात पाट लांसाठी ६५ वयाची मागणी, निवृत्ती वेतनयोजना, मानधन वाढ, पाठलांसाठी प्रशिक्षण व सक्षमीकरण कार्यक्रमांचे राज्यस्तरीय नियोजन याबाबतही ठोस पावले उचलली जातील.

कर्तव्य बजावताना पोलीस पाटलांना कायदेशीर संरक्षण मिळावे, तसेच सुरक्षा योजनेत त्यांचा अधिकृत सहभाग असावा यासाठी शासनाशी सातत्याने संवाद सुरू आहे अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. आमदार राहुल कुल यांनी नव्या अध्यक्ष अविनाश शेंडगे व सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करीत तुमच्या नेतृत्वात पुणे जिल्हा पोलीस पाटील संघ अधिक सक्षम आणि एकसंघ होवो हीच अपेक्षा व्यक्त केली.

या वेळी पुणे जिल्ह्यातील पोलीस पाटील बंधू -भगिनी सर्व तालुका अध्यक्ष, कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव मोठ्या संख्येने उपस्थित होते. समारंभात नवनिर्वाचित अविनाश शेंडगे व नव्या कार्यकारिणीचा सत्कार करण्यात आला. यावेळी यवतचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख, महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील संघाचे राज्याध्यक्ष बाळासाहेब शिंदे पाटील, भीमा पाटसचे उपाध्यक्ष नामदेव बारवकर, राज्य खजिनदार नीलकंठ थोरात, दौंड तालुका पोलीस पाटील संघाचे अध्यक्ष विलास येचकर, महिला अध्यक्षा तृप्तीताई मांडेकर महिला जिल्हा अध्यक्षा मोनिकाताई कचरे यांचेसह पुणे जिल्हा आजी माजी पदाधिकारी सर्व तालुका अध्यक्ष आदी मान्यवर उपस्थित होते.

---

### शहरातील अंतर्गत रोडवर कोणत्याही ठिकाणी वाहने पार्कींग होणार नाहीत

# कार्तिक यात्रेनिमित्त वाहतुक मार्गात बदल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात कार्तिकी शुध्द एकादशी रविवार दि. ०२ नोव्हेंबर, २०२५ रोजी असून, यात्रा कालावधी दि.२२ ऑक्टो. ते ०५ नोव्हें. असा आहे. या यात्रा कालावधीत पंढरपूर शहरातील तसेच शहरा बाहेरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. हा बदल २९ ऑक्टोबर ते ०५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीपर्यंत राहणार असून याबाबचे आदेश प्र. जिल्हा पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर दिले आहेत.

पंढरपूर शहरात प्रवेश करणाऱ्या वाहनांना सूचना- पंढरपूरात यात्रे निमित्त अहिल्यानगर, बार्शी, सोलापूर, मोहोळकडून येणारी वाहने करकंब क्रॉस रोड (अहिल्यादेवी चौक) शेटफळ चौक मार्ग विसावा येथे पार्क करावीत. तसेच ६५ एकर येथे फक्त दिंडी व पालखीचे वाहने पार्क करावीत. पुणे,सातारा,वाखरी,मार्गे येणारी वाहने वेअर हाऊस व इसबावी विसावा, कॉलेज क्रॉस चौकी मागील मैदानात पार्क करावीत. कराड, आटपाडी, दिघंची मार्गे येणारी वाहने वेअर हाऊस येथे पार्क करावीत. कोल्हापूर, सांगली, मिरज, सांगोला मार्गे येणारी वाहने कासेगांव फाटा मार्गे बिडारी बंगला, यमई-तुकाई मैदान अथवा वेअर हाउस येथे पार्क करावीत. विजापूर, मंगळवेढा मार्गे येणारी वाहने कासेगांव फाटा मार्गे यमाई तुकाई मंदीर मैदान व बिडारी बंगला येथे पार्कींग करावीत.

पंढरपूर शहरातून बाहेर जाणाऱ्या वाहनांबाबत सूचना- पंढरपूर शहरातून टेंभुर्णी, अहिल्यानगर, सोलापूर, लातूरकडे जाणाऱ्या सर्व वाहने सावरकर चौक, नवीन कराड नाका, कॉलेज क्रॉस रोड,करकंब चौक मार्गे जातील. पुणे-साताऱ्याकडे जाणारी वाहने सरगम चौक, कॉलेज क्रॉस रोड वाखरी मार्गे जातील. तर विजापूर, कराड, आटपाडी, कोल्हापूर, सांगली, मिरज, मंगळवेढा मार्गे जाणाऱ्या सर्व गाड्या सावरकर चौक, नवीन कराड नाका, टाकळी बायपासमार्गे जातील.

पंढरपूर शहरातीलअंतर्गत वाहतुकीबाबत:- २९ ऑक्टो.ते ०५ नोव्हें २०२५ पर्यंत प्रदक्षिणा मार्ग,महाव्दार चौक ते शिवाजी चौक,सावरकर चौक ते शिवाजी चौक मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद असेल. बार्शी, सोलापूर मार्गावरुन येणारी तीन रस्तामार्गे येणारी हलकी वाहने फक्त अंबाबाई पटांगणात उतरतील. नियमित ट्रक व यात्रेसाठी सोडण्यात येणाऱ्या एस.टी. बसेसना जुना दगडी पुल, नवीन पुल व तीन रस्ता मार्ग बंद ठेवण्यात येणार आहे. त्याचबरोबर मंगळवेढा नाका, महात्मा फुले चौक , या मार्गाने येणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेश बंदी आहे. अंबाबाई पटांगण ते भजनदास चौक, अंबाबाई पटांगण ते अर्बन बॅंक, सावरकर चौक ते अर्बन बॅंक, लहुजी वस्ताद चौक सर्व प्रकारच्या वाहनासांठी बंद ठेवण्यात येणार आहे.

पार्किंग व्यवस्था सूचना :- अहिल्यानगर, बार्शी, सोलापूर, मोहोळकडून येणारी वाहने करकंब क्रॉस रोड (आहिल्या चौक), तीन रस्ता मार्गे विसावा व नगरपालिकेच्या वाहनतळावर पार्किग करतील. तसेच ६५ एकर येथे दिंडी व पालखीची वाहने पार्कींग करतील. पुणे, सातारा, वाखरी, मार्गे येणारी वाहने इसबावी विसावा येथे पार्क करावीत. कराड, आटपाडी, दिघंची मार्गे येणारी वाहने वेअर हाऊस येथे पार्क करावीत. कोल्हापूर, सांगली, मिरज, सांगोला मार्गे येणारी वाहने कासेगांव फाटा, कासेगांव फाटा, बिडारी बंगला,व यमाई-तुकाई मंदीर मैदान येथे पार्क करावीत. विजापूर, मंगळवेढाकडून येणारी वाहने कासेगाव फाटा, टाकळी मार्गे वेअर हाऊस येथे पार्कींग करावीत. शहरातील अंतर्गत रोडवर कोणत्याही ठिकाणी गाड्या पार्कींग होणार नाहीत.

एकेरी मार्ग:- कॉलेज क्रॉस रोड ते सरगम चौक ते सावरकर चौक ते नवीन कराड नाका या मार्गावर एकेरी वाहतुक राहील.

संबधित भाविकांनी व वाहनधारकांनी या बदलेल्या वाहतूक मार्गाची नोंद घेऊन वाहतूक कोंडी निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन श्री. यावलकर यांनी केले आहे.